वि.दि.दा. क्र.९/२०१७
गंगाधर वि. संभाजी
वादी तर्फे सा.क्र.४
(नि.क्र.४४३)



**माझे नाव** – बापू सुखदेव जाधव, **वय** – ७१ वर्षे,
**धंदा** - शेती, **रा.** सटाना ता.जि.नाशिक.

**<u>वादीतर्फे सरतपास श्री.व्ही.एस.शेळके वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

**१.** मी वादीच्या सांगण्यावरुन साक्षीला आलो. मी वनविभागात कार्यरत होतो. वादीसुध्दा वनविभागात कार्यरत होते. मी लातूरमध्ये बरेच दिवस नौकरी केलेली आहे. वादी त्या वेळेला उस्मानाबाद मध्ये नौकरीला होता त्यामुळे त्यांची आणि माझी ओळख आहे. मी लातूर जिल्हयात सहा वर्षे कार्यरत होतो. अहमदपूर, उदगीर, औसा, लातूर अशा ठिकाणी काम केले आहे. मी सन २००३ ते २००८ या काळात विशेष असाधारण रजा अंतर्गत् विनापगारी रजेवर होतो. माझी जायखेडा ता. सटाना येथे जमीन आहे. मी तिथे द्राक्षे व डाळिंब पीक घेतो. आलेले उत्पादन दिल्ली, हैद्राबाद या ठिकाणी विकायचो. ते माझ्याकडे २००३ साली शेती कशी करतात ते बघायला आले. त्यांना डाळिंब बाग लावायची होती म्हणून मी त्यांना काही सांगू शकेन काय असे त्यांनी मला विचारले. मी रजेवर असल्याने त्यांना समक्ष गावी येऊन पाहतो असे सांगितले. मी त्यांची कोपरा येथील शेती पाहिली. त्यांच्या शेतात काही भाग पाणथळ होता. तिथे त्यांना जमीनीवर काम करावे लागेल असे सांगितले व त्यांना अंडरग्राऊंड ड्रेनेज सिस्टीम सांगितली. त्यांनी मला मी स्वत: बाग लावण्यासाठी यावे व येताना काही तज्ञांना घेऊन यावे असे सांगितले. पुर्ण शेताला चैनलिंक कुंपण करण्याचा मी सल्ला दिला. त्यांना पैसे कमी पडल्याने सुरवातीला त्यांनी बार्बेट वायर कुंपण केले. मी माझ्याकडील २५ हजार डाळींब रोप वादींना दिले. त्यावेळी १२ रु. प्रति रोप अशी किंमत होती. सदर डाळिंब रोपे त्यांनी स्वत:ची व भावाची अशी मिळून ७० एकर जमीनीवर लावली. माझ्याकडील तज्ञ व्यक्ती संतोष खैरनार रा.सटाना याचे नाव मी वादीला तज्ञ म्हणून सुचविले. मी पंधरा दिवसांतून किंवा महिन्यातून वादीच्या बागेवर जात असे व त्यांना फवारणीसंबंधी व अन्य मार्गदर्शन करत असे. मी जमीनीचा सर्वे केला त्यावेळी त्या गावात

कोणाचेही डाळींब पिक नव्हते. मी वादीला हैद्राबाचे खय्युम व दिल्लीचे राणा या दोन व्यापा-यांची नावे डाळिंब विक्रीसाठी सांगितले. ७० एकरात अंतर पीक म्हणून कांदा लावण्याचा सल्ला मी वादीला दिला व तो तसा त्याने लावला. जसे काम असेल तसे कमी जास्त मजूर संतोष खैरनार आणत असे. हाडबे म्हणून दिवाण आणि दोन सालगडी असा सगळा कारभार पाहत असे. अहमदपूर अंबाजोगाई रस्त्याला अंबाजोगाईला जाताना डाव्या बाजूला वादीचे घर होते. त्याच्या दोन्ही बाजूला त्यांनी मला शेती दाखविली होती. घराच्या दक्षिणेला नदी व उत्तरेला नाला होता. मी कांदा चाळ बनवायला सांगितली होती. त्यांनी मला ७० एकर जमीन आहे असे सांगितले. मी ज्या ज्या वेळी गेलो त्या त्या वेळी मला कोणीही अडथळा आणला नाही.

**सरतपास पूर्ण.**

**<u>प्रतिवादी १ ते ५ तर्फे श्री. बी.एन.पौळ वकिल यांच्यामार्फत उर्वरीत सरतपास शपथेवर सुरु.</u>**

**२.** हे खरे की, मी सटाण्याचे रहिवासी आहे. मी लहानपणापासून तिथे राहतो. हे खरे की, मी लातूर येथे आर.एफ.ओ.व गंगाधर उसमानाबाद येथे एस.डी.एफ.ओ. म्हणून कार्यरत होतो. हे खरे की, त्यांच्याकडे लातूर व उस्मानाबाद हे दोन जिल्हे होते. ते माझे वरिष्ठ होते हे खरे नाही. मी त्यांच्या भावांना ओळखत नाही व त्यांची नावे मला माहिती नाहीत. त्यांच्या जमीनीच्या वाटण्या झाल्या होत्या की नाही हे मला माहिती नाही. त्यांच्या भावाची जमीन या ७० एकरामध्ये होती. हे खरे की, किती होती हे मला माहिती नाही. हे खरे की, गंगाधरची जमीन किती होती हे मला माहिती नाही. हे खरे की, मला त्या जमीनीच्या चतु:सिमा व सर्वे क्रमांक माहिती नाही. भावाची संमती होती का हे मला माहिती नाही. मी स्वत: त्यांची अंतर्गत ड्रेनीज करुन दिली. डाळिंबासाठी माझी स्वत:ची फर्म नव्हती किंवा लायन्सस नव्हते. हे खरे नाही की २५ हजार रोपे मी त्यांना विकली असे मी खोटे सांगतो. सेंद्रीय आरकता या जातीचे ते रोपे होती.

या रोपांच्या खरेदी विक्रीची पावती नाही. कोपरा गावात त्यावेळी बापुराव पाटील, अशोक पाटील यांच्याही डाळींबाच्या बागा होत्या हे खरे नाही. माझा डाळिंबातील शैक्षणिक स्वरुपातील अभ्यास नाही. संतोष खैरनार याचाही असा डिप्लोमा नाही. हे खरे की, संतोष आज रोजी माझ्या सांगण्यावरुन न्यायालयात आलेला आहे. हे खरे नाही की, मी आज रोजी वादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. कोपरा गावातील कोणीही माझ्या ओळखीचे नाहीत.

**उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**
**फेरतपास नाही.** समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक १६/०१/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**